महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.कशिप्र-१४२४/मॉप_अप_फेरी_सूचना/१५५८/२०२४ दि.०३ सप्टेंबर २०२४

## (मॉप अप प्रवेश फेरीबाबत सूचना)

दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठीच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीया २०२४-२५ मधील कॅप फेरी-२ नंतर रिक्त राहिलेल्या जागा मॉप अप प्रवेश फेरीद्वारे समुपदेशन करुन भरणेसाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया राबविण्यात येईल.

- दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठीच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीया २०२४-२५ मधील कॅप फेरी-२ नंतर रिक्त राहिलेल्या जागा समुपदेशनाद्वारे भरण्यासाठी वेळापत्रकानुसार दिनांक १० सप्टेंबर २०२४ रोजी मॉप अप प्रवेश फेरीचे आयोजन करण्यात येईल.
- सदर फेरीसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत www.mahacet.org या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या दृष्यकला पदवी प्रथम वर्ष (२०२४-२५) प्रवेशासाठीच्या महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय उमेदवारी असलेले व अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट असलेले सर्व उमेदवार तसेच केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेस नोंदणी केलेले तथा दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेत नॉन झिरो प्राप्तांक मिळवलेले उमेदवार पात्र असतील.
- मॉप अप प्रवेश फेरीसाठी संकेतस्थळावर दि.०३ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ४ वाजेनंतर शासकीय व खाजगी विनाअनुदानित कला महाविद्यालयातील कॅप फेरी २ नंतर रिक्त राहिलेल्या जागांची प्रवर्गनिहाय यादी प्रदर्शित करण्यात येईल तसेच फेरीदरम्यान ऐनवेळी रिक्त झालेल्या जागा सुद्धा भरण्यात येतील.
- मॉप अप प्रवेश फेरीसाठी दर्शविलेल्या रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान ज्या प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात आल्या होत्या, त्या प्रवर्गाच्या उमेदवारांमधूनच भरण्यात येतील,

तदनंतरही जागा रिक्त राहिल्यास, त्या जागा अर्जदाराच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.

- मॉप अप प्रवेश फेरीसाठी उमेदवारांनी त्यांच्या अर्जावर नमुद केलेली सर्व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी तात्काळ सादर करणे आवश्यक आहे.
- ज्या उमेदवारांनी त्यांची मुळ कागदपत्रे इतर कला महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रियेदरम्यान दाखल केली असतील अशा उमेदवारांनी त्या संबंधित कला महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र **(संबंधित महाविद्यालयाच्या लेटरहेडवर कागदपत्रे महाविद्यालयाकडे जमा असल्याबाबत लेखी प्रमाणपत्र)** सादर करणे आवश्यक आहे.
- केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेच्या कॅप फेरी-१ व २ मधुन प्रवेश घेतलेल्या उमेदवारास मॉप अप फेरीदरम्यान नवीन कला महाविद्यालयात किंवा त्याच महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रमास जागा नियतवाटप झाल्यास सदर उमेदवाराची कॅप फेरी १ किंवा २ मध्ये प्रवेशित जागा मॉप अप फेरीसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांच्या गुणवत्ता यादीतील संबंधित उमेदवारापासुन उतरत्या क्रमाने गुणवत्ता यादीतील उर्वरीत उमेदवारांना उपलब्ध करण्यात येईल.
- मॉप अप प्रवेश फेरीद्वारे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी दि.०४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजेनंतर दि.०८ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत आपल्या नोंदणीकृत लॉगीन आयडी वरून रजिस्ट्रेशन फॉर मॉप अप फेरी या लिंक द्वारे नोंदणी करणे क्रमप्राप्त आहे.
- मॉप अप प्रवेश फेरीकरिता नोंदणी केलेल्या उमेदवारांनी नोंदणी अर्जाची ऑनलाईन पोच पावती व मूळ कागदपत्रांसह विहीत वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांनचाच मॉप अप फेरीत समावेश करण्यात येईल.
- अखिल भारतीय उमेदवारांसाठी आरक्षित असलेल्या जागा मॉप अप फेरीद्वारे भरणेकरीता अखिल भारतीय उमेदवारी असलेल्या मॉप अप फेरीसाठी नोंदणीकृत उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. अखिल भारतीय उमेदवारी असलेले मॉप अप फेरीसाठी नोंदणीकृत उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा महाराष्ट्र राज्य उमेदवारांकरिता Inter se merit नुसार उपलब्ध करण्यात येतील.

मॉप अप तथा अतिरीक्त कॅप प्रवेश फेरीकरिता उमेदवारांचे पात्रता निकष (महाराष्ट्र शासनामार्फत तयार महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अन्वये तयार करण्यात आलेले पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व प्रथम वर्ष दृष्यकला पाठ्यक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन, नियम, २०१७, सुधारित २०१९ व २०२० यांस अधीन राहुन खालील प्रमाणे लागु करण्यात येईल.

१. दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशाची केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट असलेले सर्व उमेदवार. (महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार)

२. दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठीच्या पहिल्या २ कॅप फेऱ्यांमध्ये कोठेही प्रवेश न मिळालेले उमेदवार.

३. दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशाची केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेद्वारे शासकीय आणि खाजगी विनाअनुदानित कला महाविद्यालयात प्रवेश घेतलेले उमेदवार.

**४. दृष्यकला पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी दिनांक १२ मे २०२४ रोजी घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेत (एम.ए.एच.-ए.ए.सी.-सी.ई.टी. २०२४) नॉन झिरो प्राप्तांक मिळवलेले उमेदवार. (दि.१० सप्टेंबर २०२४ रोजी मूळ कागदपत्रांच्या पडताळणीस अधीन राहुन) सदर उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया तथा मॉप अप फेरीसाठी आवेदनपत्र विहीत मुदतीत सादर करणे बंधनकारक असेल.**

- मॉप अप प्रवेश फेरीकरिता आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराजवळ स्वतःचे जात वैधता प्रमाणपत्र तसेच प्रवर्गनिहाय आरक्षणाचा दावा केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे असणे अनिवार्य असेल.
- मॉप अप प्रवेश फेरी दि.१० सप्टेंबर २०२४ रोजी सर ज. जी. महाविद्यालय, मुंबई येथे (दुपारी १२.०० पासुन) संचलित करण्यात येईल.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा. प्र. से.)
आयुक्त तथा सक्षम प्राधिकरी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
मुंबई